वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-मंगळवार दि. २८ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

# विरोधक राजीनामा मागून मागून थकले
# पण राजीनामा नाहीच

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

## दमानियांचे पुरावे, मुख्यमंत्र्यांची भेट तरी राजीनामा नाही-अजित पवार



मुंबई , (दिव्य न्युज):- ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली होती, त्यांनी मंत्री धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली, त्यानंतर आज अजित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे, या भेटीकडे राज्याचं लक्ष लागलं होतं. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याबाबत या भेटीत काय निर्णय होणार याबाबत मोठी उत्सुकता होती, त्यावर आता अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

दमानिया यांनी काही कागदपत्रं माझ्याकडे दिली आहेत. मी ती घेतली पाहिली. मी आज रात्री मुख्यमंत्र्यांची भेट घेणार होतो. पण त्यांना नागपूरला जायचं असल्यानं मी त्यांना आत्ताच भेटलो. ▶▶ पान २ वर

# बीड जिल्ह्यात बिंदू नामावलीचं वाटोळं झालंय

## १५ वर्षापासून एकच पोलीस अधिकारी; सुरेश धसांनी सगळंच काढलं



बीड, (दिव्य न्युज):- पवनचक्की कंपनीला खंडणी मागितल्या प्रकरणी वाल्मीक कराड याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याच्याविरोधात मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणावरुन राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. आज मंत्रालयात बैठक झाली. या बैठकील भाजपा आमदार सुरेश धस उपस्थित होते. बैठकीनंतर आमदार धस यांनी माध्यमांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी बीड जिल्ह्यात बिंदु नामावलीचं वाटोळं झाल्याची प्रतिक्रिया दिली.

मंत्रालयातील बैठकीनंतर भाजपा आमदार सुरेश धस यांनी पत्रकारांसोबत संवाद साधला. यावेळी आमदार धस म्हणाले,बीड जिल्ह्यात बिंदु नामावलीची वाट लागली आहे. बीड जिल्ह्यात बिंदु नामावलीची वाट का लागली याचे शोध मोहिम केले पाहिजे. हे कोणामुळे झाले, का झाले? याची माहिती काढली पाहिजे. आज एसपींनी आडनावाने बोलावू नका म्हणून आदेश काढला. उद्या ही वेळ जिल्हाअधिकारी यांच्यावर येईल, असंही धस म्हणाले.

परळीमध्ये आजही राखेची वाहतूक होत आहे. फक्त ही वाहतूक रात्रीची सुरु आहे. अवैध राखेचे साठे जप्त करण्यात यावेत. गेल्या २० वर्षापासून परळीतील थर्मलमध्ये काही अधिकारी आणि कर्मचारी एकाच पोस्टवर आहेत. बदली अधिनियम ३ वर्षाचा कार्यकाळ असतो. म्हणून मी परळी थर्मलमधील अधिकाऱ्यांना एवढ्या वर्षे एकाच ठिकाणी राहण्याची परवानगी कोणी दिली? यासाठी मी मुख्यमंत्र्यांकडे पत्र दिले आहे. राखेचे अवैध साठे कोणाचे आहेत. याबाबत मी उद्या नावे जाहीर करणार आहे. अनेक धक्कादायक नावे आहेत, असा गौप्यस्फोटही सुरेश धस यांनी केला.

भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते व्यापारी भगीरथ बियाणी यांनी गोळी झाडून आत्महत्या केली. त्या ▶▶ पान २ वर

# समान नागरी कायद्याचे राज्य

## भाजपच्या आश्वासनपूर्तीची उत्तराखंडमधून सुरुवात

डेहराडून, (वृत्तसेवा):- उत्तराखंडमध्ये सोमवारपासून समान नागरी कायद्याची (यूसीसी) अंमलबजावणी सुरू झाली असून हा कायदा करणारे हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. यापुढे उत्तराखंडमध्ये विवाह, घटस्फोट आणि मालमत्तेबाबत सर्व नागरिकांना एकच नियम लागू झाला आहे. अनुसूचित जमाती तसेच राज्यातून अन्यत्र स्थलांतर केलेल्या नागरिकांना मात्र कायद्याच्या कक्षेतून बाहेर ठेवण्यात आले आहे.

सोमवारी झालेल्या एका समारंभात उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी समान नागरी कायदा अधिकृतरीत्या लागू झाल्याचे जाहीर केले. यावेळी त्यांनी 'यूसीसी' संकेतस्थळाचे उद्घाटनही केले. या संकेतस्थळावर विवाह तसेच 'लिव्ह इन' संबंधांची नोंदणी करणे बंधनकारक असेल. स्वत: धामी यांनी सर्वप्रमथ या संकेतस्थळावर आपल्या विवाहाची नोंदणी केली, तसेच नंतर नोंदणी करणाऱ्या पहिल्या पाच जणांना ▶▶ पान २ वर



## महसूल प्रशासनाचा मानाचा पुरस्कार पत्रकार अय्युब बागवान यांना प्रदान

### आ. विजयसिंह पंडित यांच्या कडून सन्मान

गेवराई , (दिव्य न्युज):- २६ जानेवारी रोजी तहसील कार्यालयातील मुख्य शासकीय ध्वजारोहण झाल्यानंतर तहसील कार्यालयाच्या प्रांगणात झालेल्या शानदार सोहळ्यात विधानसभा निवडणुकीत लोकशाही बळकट करण्यासाठी प्रशासनाला मदत करणारे अभ्यासू पत्रकार म्हणून गेवराईचे



ज्येष्ठ पत्रकार अय्युब बागवान यांना महसूल प्रशासनाचा ▶▶ पान २ वर

# बीडच्या सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी आ.क्षीरसागर अजितदादांकडे

## तातडीने कार्यवाही करण्याचे प्रधान सचिवांना अजितदादांचे निर्देश

बीड, (दिव्य न्युज):- बीड शहराला सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. याचसंदर्भात मंगळवारी (दि.२८) रोजीही आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची भेट घेतली. यावर अजितदादांनी





नगरविकास विभागाचे प्रधान सचिव यांना तातडीने हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

मुबलक प्रमाणाय पाणीसाठा उपलब्ध असून देखील बीड शहराला सुरळीत पाणीपुरवठा होत नाही. ▶▶ पान २ वर

## फरार कृष्णा आंधळेचा मृत्यू झाला? नव्या दाव्याने राजकारणात खळबळ

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणावरून राज्यातील राजकारण ढवळून निघाले आहे. तपासाची चक्रे वेगाने फिरत असली तरी राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी दबाव वाढत आहे. त्यातच, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) नेते संदीप क्षीरसागर यांनी खळबळजनक दावा केला आहे. संतोष देशमुख प्रकरणातील चौथा आरोपी कृष्णा आंधळे हा जिवंत नसेल, असा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतल्याशिवाय या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणार नाही, असेही ते म्हणाले.संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी कृष्णा आंधळे हा अद्याप ▶▶ पान २ वर



बीड : येथील मिलिया माध्यमिक महाविद्यालयचे मुख्याध्यापक सय्यद अब्दुल सत्तार यांचे चिरंजीव सय्यद रिजवान अहेमद (सॉफ्टवेअर इंजिनिअर) यांचा शुभविवाह नांदेड येथील ॲड.मोहंमद नसीरोद्दीन फारूकी यांच्या मुलीशी नांदेड येथे अनेक मान्यवरांच्या उपस्थिती मोठ्या थाटात लग्न समारभ संपन्न झाला. बीड येथील आयोजित कार्यक्रमात नवरदेव सय्यद रिजवान अहेमद यांना लग्नाच्या शुभेच्छा देतांना जमिएत उलमा ए हिंदचे हाजी मुज्तबा अहेमद खान, सेवानिवृत्त शिक्षक मोहंमद इसाक, फेरोज खान, मिलिया महाविद्यालयाचे सिनीयर क्लर्क तल्हा चाऊस, मोहंमद काशेफ व संपादक मोहंमद अबुबकर.

# नगर पालिकेतील मालमत्ता क्र.३/१८ चा
# मालमत्ता नोंदणीचे रजिस्टर झाले चकणाचूर

## वेळेत मालमत्ता धारकांना पीटाआर नाही मिळाला तर त्यांचे घरकुलाचे स्वप्न होईल भंग



### अजितदादा पवार साहेबांनी याकडे लक्ष देण्याची नगरसेवक सादेक अली यांची मागणी

बीड, (दिव्य न्युज):- बीड नगर पालिकेतील मालमत्ता विभागातील शहरातील अत्यंत जुना भाग असलेल्या इस्लामपुरा, भालदारपुरा, गोशानशीन, गांधी ▶▶ पान २ वर



## जुन्या ओळखीने घात केला; तीन महिन्यांनी उकल

# बीडच्या महिलेचा औरंगाबादमध्ये खून



खुलताबाद , (दिव्य न्युज):- वेरूळ घाटात सापडलेल्या अनोळखी महिलेच्या मृत्यूचे गूढ उकलले असून, तीचा खून झाल्याचे तपासातून निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी खुलताबाद पोलिसांनी तांत्रिक तपासाद्वारे आरोपींना अटक करून प्रकरणाची उकल केली आहे. तीन महिन्यांपूर्वी वेरूळ घाटात महिलेच्या कुजलेल्या अवस्थेतील मृतदेहावरील पांढऱ्या मण्यांची माळ अन् तीन धातूंच्या अंगठीने तपासाला सुरुवात करून पोलिसांनी बीड येथील महिलेची औरंगाबादमधीललरींळि दोघांनी हत्या केल्याचे क्लिष्ट तपासातून ▶▶ पान २ वर

## ऊर्दू शिक्षकांना न्याय मिळवून देऊ-आ.इंद्रीस नायकवडी

सातारा , (दिव्य न्युज):- ओरवाड येथे कोल्हापूर सांगली व सातारा जिल्हा अखिल भारतीय ऊर्दू शिक्षक संघ च्या वतीने विधान परिषदेचे आमदार इंद्रीस नायकवडी यांच्या सत्कार करण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मा आमदार.श्री ▶▶ पान २ वर



## राज्यातील सर्वात मोठे गर्भलिंगनिदान-गर्भपात रॅकेट

# १५ हजारांसाठी ५ महिला डॉक्टर करत होत्या गर्भातच मुलींची हत्या



जालना, (दिव्य न्युज):-गर्भलिंगनिदान व गर्भपाताचे राज्यातील आतापर्यंतचे सर्वात मोठे रॅकेट जालना, छत्रपती संभाजीनगर व बुलडाणा जिल्ह्यात सुरू असल्याचे उघडकीस आले आहे. जालना जिल्ह्यातील भोकरदन तसेच छत्रपती संभाजीनगरात डॉ.दिलीपसिंग राजपूत व डॉ.राजेंद्रकुमार सावंत (रा.जाधववाडी) हे गर्भलिंगनिदान करायचे अन् गर्भपातासाठी नाना सहाणे हा एजंट गर्भवती महिलांना जालना, छत्रपती संभाजीनगर व बुलडाणा जिल्ह्यातील १२ डॉक्टरांकडे पाठवायचा, त्यापैकी ५ महिला डॉक्टर (बुलडाणा, चिखली, देऊळघाट, जालना, भोकरदन येथील प्रत्येकी एक) आहेत. त्या गर्भातच मुलींच्या गर्भाची हत्या करायच्या, असे जालना पोलिसांनी केलेल्या तपासात समोर आले आहे.आतापर्यंत २८ आरोपींवर गुन्हा दाखल झाला. त्यात ३ डॉक्टरांना अटक झाली असून इतर फरार आहेत. १३ वर्षांपूर्वी परळीत स्त्रीभ्रूणहत्येचा डॉ.सुदाम मुंडे यांनी कारखानाच उघडला होता. त्यात एकूण १७ आरोपी होते. मुंडे दांपत्यास शिक्षा झाल्यानंतर तो बंद पडला.

### डॉक्टर म्हणायचे, 'तुमचे पाप तुम्हीच घेऊन जा...'

१ लिंगनिदानासाठी घेतले भाड्याचे घर औरंगाबाद येथील डॉ.राजेंद्रकुमार सावंत याने भोकरदन येथे एक घर भाड्याने घेतले होते. संभाजीनगर येथून सोनोग्राफी यंत्र आणायचा, तेथे गर्भलिंगनिदान करायचा. सहाणे महिलांना त्यांच्या सोयीनुसार ठिकठिकाणी डॉक्टरांकडे पाठवायचा.

### २ राज्यभरातून येत होत्या गर्भवती

गर्भलिंगनिदानासाठी जालना व भोकरदन येथे राज्यातील पुणे, नाशिक, जळगाव, यवतमाळ, परभणी, जालना, बीड, छत्रपती संभाजीनगर येथील गर्भवती महिला येत असल्याचे पोलिस तपासात आतापर्यंत समोर आले आहे.

### डॉक्टर, रुग्ण, एजंट या तिघांमध्ये झाला संवाद

आरोपी नाना सहाणे हा डॉ.दिलीपसिंग राजपूत यांच्या सासऱ्याकडे चालक होता. त्यानंतर तो डॉ.दिलीपसिंग यांच्याकडे २०१६ ते १९ पर्यंत कामाला होता. त्यानंतर त्याने काम सोडले व गर्भलिंगनिदान व गर्भपातासाठी महिला व डॉक्टर यांच्यात मध्यस्थीचे काम करू लागला. या तिघांमध्ये मोबाइलवरून वारंवार संवाद झाला असल्याचे पुरावे पोलिसांना सापडले आहेत.

### रॅकेटमध्ये आणखी काही आरोपी वाढण्याची शक्यता

गर्भलिंगनिदान व गर्भपाताच्या रॅकेटमध्ये अनेक जिल्ह्यांतील डॉक्टर सहभागी आहेत. त्यांच्या संपर्कात असलेल्यांची चौकशी सुरू आहे, काही आरोपी वाढण्याची शक्यता आहे.
-योगेश उबाळे, तपास अधिकारी

**प्रश्न : सेक्स रेशोमध्ये मुलींचे प्रमाण कमी होत असतानाही प्रशासनाने झोपेचे सोंग का घेतले?**

**प्रश्न : गर्भपातानंतर त्यांची विल्हेवाट अशा पद्धतीने लावण्यात येत असल्याने ते शोधण्याचे आव्हान आहे.**

**प्रश्न : या रॅकेटमध्ये १२ डॉक्टर व अनेक कर्मचारी सहभागी असताना आरोग्य विभागाला कसे समजले नाही?**

### नऊ वर्षांपासून सुरू होता भ्रूणहत्येचा हा कारखाना

२०१६ पासून भ्रूणहत्येचा हा कारखाना सुरू होता. आरोपी नाना सहाणे हा मराठवाडा व विदर्भातील काही एजंटांच्या माध्यमातून गर्भवतींना शोधायचा अन् त्यांच्या सोयीनुसार गर्भपातासाठी ठिकठिकाणी पाठवायचा.

### गर्भपातानंतर विल्हेवाट लावायचे नातेवाईकच

गर्भपात केल्यानंतर काही डॉक्टर हे ती महिला व त्यांच्या नातेवाइकांकडे तो गर्भ सोपावयचे. 'तुमचे पाप तुम्ही घेऊन जा अन् विधिवत सोपस्कार करा'...असा सल्ला देत असत. त्यामुळे काही डॉक्टरांकडे पोलिसांना गर्भ आढळले नाहीत.

### एमडी अन् एमबीबीएस १२ डॉक्टर पडले मोहाला बळी

गर्भलिंगनिदानासाठी १५ हजार व गर्भपातासाठी १५ हजार रुपये डॉक्टर घेत असत, तर एजंट प्रत्येक रुग्णाकडून २ ते ३ हजार रुपये घ्यायचा. एमबीबीएस, एमडी असे १२ डॉक्टर या पैशांच्या मोहाला बळी पडल्याचे समोर आले आहे.

# अकुशल व्यक्तींना रोजगार प्रत्येक गावामध्ये कामे उपलब्ध करावे-शाहीन पठाण

बीड, (दिव्य न्युज):- क्रांती महिला असंघटीत कामगार युनियन महाराष्ट्र राज्य मार्फत जवळपास २० ग्रा.पं.मध्ये अकुशल व्यक्तींना रोजगार मिळावा म्हणुन रोजगार हमीचे नमुना नं.४ चे काम,मागणी पत्र,जॉब नंबर सहित भरून देखील कामे मिळाले नाही. त्या अनुषंगाने दि.१४/०२/२०२३ मध्ये देखील आम्ही काम मागणी पत्र ग्रा.पं.मधील सरपंच,ग्रामविकास अधिकारी यांना देण्यात आले होते व कामाची मागणी केली पण त्यांनी सहा-सहा महिने होऊनही आम्हाला पोहोच पावत्या पण देऊ शकले नाहीत.

ज्या ग्रा. पंचायतने महिलांना कामे दिले परंतु प्रत्येक महिलांना अनावश्यक कामाची मनामध्ये भिती घालुन तुम्हाला दगडे उचलावे लागतील.खड्डे खांदावी लागतील अशी भिती महिलांच्या मनात घालवुन दिली.व दोन दिवस काम करुन काम बंद केले.त्यामुळे आम्हाला क्रांती महिला असंघटीत कामगार युनियन महाराष्ट्र राज्य यांच्याकडे धाव घेवुन त्यांच्यामार्फत काम मागणी पत्र ग्रामपंचायत कार्यालय तळनेवाडी,धोंडराई,श्रीपत आंतरवाला, रामपुरी, पाडळसिंगी, मादळमोही, अर्धमसला, सिरसदेवी, राजापुर, केकतपांगरी, कुंभारवाडी, दैठन, भोजगाव, उमापुर, तलवाडा, आगरनांदुर, राक्षसभुवन, राजपिंपरी, गोडगाव, देवपिंपरी व ईतर ग्रामपंचायतमध्ये काम मागणीपत्र भरण्यात आले होते परंतु ग्रामपंचायतीतील जबाबदार व्यक्तींनी कामे न देता आम्ही दिलेल्या काम मागणी पत्राच्या पोहोचपावत्या काहींनी दिल्या नाहीत.जर महाराष्ट्रात रोजगार हमी नियमाची अंमलबजावणी १९७७ पासुन महाराष्ट्रात सुरु झाली. त्यानुसार कलम १२ (ई ) नुसार कामे देण्याचे नियमात असतानाही कामापासुन जॉब धारक मजुरांना डावलले जात आहे. मजुरामार्फ़त करण्यात येण्यासारखे कामे मशीनद्वारे होत असुन ते बंद करण्यात यावे. तालुक्यातील अनेक ग्रामपंचायत मध्ये मुळ मतदान यादीतील गावकरी किंवा लाभार्थी नसुन दुसऱ्या गावातील किंवा अन्य ठिकाणचे लाभार्थी आहेत.अनेक जॉबकार्ड धारकांचे बँक अकाउंट न.हे बोगस आहेत त्यामुळे सरकारची आर्थिक लुट हि नरेगामार्फत सुरु आहे.याची सखोल चौकशी करण्यात यावी.बीड जिल्हा हा दुष्काळग्रस्त असल्याने सतत ऊसतोडीसारखे कामे करावी लागतात. ज्यामुळे मुलांच्या शिक्षणात बाधा येवुन मुले शिक्षणापासून वंचित राहतात.जर मजुरांच्या हाताला काम मिळाले तर इतरत्र कामे



करण्याची आवश्यकता पडणार नाही.काही ग्रामपंचायतमध्ये जबाबदार व्यक्ति संगमत करुन नरेगाची कामे मशीनद्वारे करुन घेतात शासनाच्या भरपुर योजना असुनही त्यांच्या अंमलबजावणी इमानेइतबारे होत नाही. अशा ग्रामपंचायतीस आपल्यामार्फ़त सक्त ताकीद देवुन मजुरांना कामे उपलब्ध करुन देण्यात यावेत. नसता संघटनेमार्फत आंदोलन करण्यात येईल. रोजगार निर्मितीची जबाबदारी हि ग्रामपंचायतची असुनही कोणतीही ग्रामपंचायत मजुरांकडून कामे करुन घेत नाही त्यामुळे काम मागणी पत्र भरूनही कामे मिळत नाहीत.तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीला मजुरांनी काम मागणी पत्र भरल्यानंतर नमुन्यातील पोहोच पावती देणे बंधनकारक करावे व सर्व जॉब कार्ड धारकांना न्याय देण्यात यावे.अशी मागणी मा.जिल्हाधिकारी साहेब यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.या वेळी क्रांती महिला असंघटीत कामगार युनियन महाराष्ट्र राज्य,संस्थापक अध्यक्ष शाहीन पठाण ,शकुंतला गुन्गासे,मंदाकिनी भागवत चौधरी,मनीषा सुनील शरणांगत,रोहिणी बाळासाहेब राऊत,शेख गुलरुख ज़हिन (राणी ताई ),हिना शमसोद्दिन शेख ,बाळासाहेब वाघमारे,विशाल वक्ते ,अविनाश पानखडे ,शेख आमेर पाशा संस्थापक अध्यक्ष शेर-ए-हिंद ग्रुप ऑफ़ महाराष्ट्र राज्य आदींनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

पान १ वरून

## दमानियांचे पुरावे,

त्यांनी मला सांगितलं तुम्हाला जशा दमानिया भेटल्या तशा त्या मलाही भेटल्या. मलाही त्यांनी काही कागदपत्रं दिले आहेत. या प्रकरणात तीन प्रकारच्या चौकशा सुरू आहेत. एसआयटी, सीआयडी आणि न्यायालयीन. ही कागदपत्रे मी सीआयडी आणि एसआयटीकडे दिली आहेत. कुणी पुरावे दिले तर त्याची शहानिशा करावी लागते, म्हणून ते सीआयडी आणि एसआयटीकडे देण्यात आले आहेत. जी वस्तुस्थिती समोर येईल त्यानुसार पुढच्या गोष्टी काय करायच्या ते ठरवलं जाईल, असं मुख्यमंत्री यांनी सांगितल्याचं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

दरम्यान ते पुढे बोलताना म्हणाले की, मी आणि मुख्यमंत्र्यांनी आधीपासूनच सांगितलं. जी घटना सरपंचांच्याबाबत बीड जिल्ह्यात घडली. त्याची चौकशी सुरू आहे. दोषी असतील त्यांना फाशी दिली पाहिजे, तसा प्रयत्न सुरू आहे. चौकशी चालू आहे. कुणाची आणखी नावे आली तर त्यावरही कारवाई केली जाईल. पण कुणाचा संबंधच नसेल तर कारवाईचा प्रश्नच येत नाही. संबंध असेल तर कुणालाही पाठी घालणार नाही. ही माझी, मुख्यमंत्री आणि एकनाथ शिंदे यांची भूमिका आहे. माझ्यावर आरोप झाले, तेव्हा मी राजीनामा दिला होता. माझी गोष्ट वेगळी होती. माझ्या वेळी जी घटना घडली होती मला ते असह्य झालं, म्हणून मी राजीनामा दिला. आता चौकशी सुरू आहे. दोषींना पाठिशी घालणार नाही, कारवाई केली जाईल, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

## बीड जिल्ह्यात बिंद

आत्महत्येची चौकशी व्हावी अशी मागणी मी केली आहे,असंही आमदार सुरेश धस म्हणाले. परळी शहरातील रस्स्त्यांवर सुद्धा असेच पैसे उचलले आहेत. एकदा आपण परळीतील रस्ते दाखवले पाहिजेत. करुना शर्मा यांच्या गाडीमध्ये जी बंदुक ठेवली होती. ती बंदुक एका पोलीस अधिकाऱ्यानेच ठेवली होती. ते अधिकारी आजही बीड पोलिसमध्ये कार्यरत आहेत. त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहिजे. भास्कर केंद्रे नावाचे एक पोलीस आहेत, त्यांचे राखेचे टीप्पर आहेत, असा गंभीर आरोप आमदार सुरेश धस यांनी केला.

## समान नागरी

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी धामी म्हणाले, की समान नागरी कायदा लागू करून भाजपने आणखी एक निवडणूक आश्वासन पूर्ण केले आहे. या कायद्यामुळे राज्यातील कोणत्याही धर्माच्या नागरिकांसाठी आता एकसारखे कायदे लागू राहणार असून याचे श्रेय राज्यातील जनतेचेच आहे. हा कायदा कोणताही धर्म किंवा समाजाला लक्ष्य करण्यासाठी केला नसल्याचा दावाही मुख्यमंत्र्यांनी केला. उलट कायदेशीर भेदभाव दूर करणारे हे घटनात्मक आयुध असल्याचे ते म्हणाले. यामुळे हलाला, इद्दत यासारख्या कुप्रथा बंद होतील, अशी पुष्टीही त्यांनी जोडली. अनुसूचित जमातींमधील सामाजिक आणि विवाहपद्धतींचे वेगळेपण जपण्यासाठी त्यांना कायद्याच्या कक्षेतून बाहेर ठेवल्याचे धामी यांनी स्पष्ट केले.

२०२२ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपच्या वचननाम्यात समान नागरी कायद्याचे आश्वासन देण्यात आले होते. धामी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने सत्ता कायम राखल्यानंतर राज्याचे माजी मुख्य सचिव शत्रुघ्न सिन्हा यांच्या नेतृत्वाखाली पाच सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली होती. समितीच्या अहवालानंतर कायद्याला अंतिम स्वरूप देण्यात आले व २० जानेवारी रोजी धामी मंत्रिमंडळाने त्याला मंजुरी दिली. १३ जानेवारीपासून सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना हा कायदा तसेच संकेतस्थळाबाबत प्रशिक्षणही देण्यात येत आहे.

समान नागरी कायद्याची 'गंगोत्री' उत्तराखंडमध्ये उगम पावली असून ती लवकरच संपूर्ण देशात वाहू लागेल, अशी आशा आहे. भारतीय राज्यघटनेच्या इतिहासात आपण हे सोनेरी पान लिहिले आहे.

– पुष्करसिंह धामी, मुख्यमंत्री, उत्तराखंड

## महसूल प्रशासनाचा

मानाचा असा पुरस्कार गेवराई तालुक्याचे नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडित, तहसीलदार संदीप खोमणे नगरपालिकेचे प्रशासक विक्रम मांडुरके सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उप अभियंता तिडके नायब तहसीलदार संजय सोनवणे , सुभाष कट्टे पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तोर यांच्या सह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. तहसील प्रशासनाच्या मानाच्या पुरस्काराने सन्मानित झाल्यानंतर प्राध्यापक राजेंद्र बरकसे, डॉ सुभाष सुतार, डिजिटल मिडियाचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे इरा पब्लिक स्कूलचे संस्थापक अध्यक्ष गणेश क्षीरसागर अँड अब्बास भाई शेख, आतार संघटनेचे जिल्हाध्यक्ष इस्माईल भाई आतार सह अनेक मित्रपरिवाराने प्रत्यक्ष भेटून शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

## फरार कृष्णा आंधळेचा

फरार आहे. २०२३ मध्ये त्याच्यावर हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल झाला होता, तरीही त्याला अटक झाली नव्हती. धक्कादायक बाब म्हणजे, मागील चार वर्षांत त्याच्यावर धारूर, आंबेजोगाई आणि केज पोलीस ठाण्यांमध्ये खंडणी, मारहाण आणि खुनाचा प्रयत्न यासारखे सहा गंभीर गुन्हे दाखल आहेत. एवढे गुन्हे करूनही तो मोकाट कसा फिरत होता? त्याला कोणी पाठीशी घालत होते का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

बीडमधील अनेक प्रकरणे आता समोर येऊ लागली आहेत. लोक स्वतःहून पुढे येऊन अन्यायाविरोधात बोलत आहेत. संतोष देशमुख प्रकरणातील चौथा आरोपी कृष्णा आंधळे जिवंत नसेल असा मला संशय आहे. धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतल्याशिवाय या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणार नाही, असे संदीप क्षीरसागर म्हणाले. त्यांनी कृष्णा आंधळे जिवंत नसल्याचा संशय व्यक्त करून खळबळ उडवून दिली आहे. एखादा विषय अंगलट येतो तेव्हा तो माणूस गायब होतो, आणि मला वाटत नाही की हा माणूस सापडेल, असेही ते म्हणाले.

प्रशासनाला मोकळेपणाने तपास करायचा असेल तर धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतलाच पाहिजे, असे क्षीरसागर यांनी ठामपणे सांगितले. ते म्हणाले की, पहिल्यांदाच हा विषय बाहेर आला आहे, आणि जर एखाद्या व्यक्तीला पकडायचे ठरवले तर तो २४ तासांत सापडतो. त्यामुळे कृष्णा आंधळे याच्या जीवाशी घातपात झाला असावा. क्षीरसागर यांच्या या विधानामुळे खळबळ उडाली आहे.

संदीप क्षीरसागर यांनी संतोष देशमुख प्रकरणी बोलताना अनेक गौप्यस्फोट केले. ते म्हणाले, दादांचा (शरद पवार) स्वभाव असा आहे की चुकीची गोष्ट त्यांना कधीच पटत नाही. या प्रकरणी सरकारने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या आदेशावरून एसपींची बदली केली आहे. गुन्हा नोंदवायला दहा-बारा तास उशीर झाला आणि ज्यांनी हा विलंब केला त्यांच्यावर कारवाई होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या प्रकरणात लोकांनी स्वतःहून रस्त्यावर उतरून आवाज उठवला आहे, असे सांगत क्षीरसागर म्हणाले की, अन्याय झालेल्या लोकांनी पुढे येऊन बोलायला सुरुवात केली आहे. बीड जिल्हा शल्यचिकित्सक चुकीचे काही करत असतील असे मला अजिबात वाटत नाही, असे म्हणत त्यांनी शल्यचिकित्सकांचा बचाव केला.

## बीडच्या सुरळीत

पंधरा-पंधरा दिवसांतून एकदा पाणी बीड शहरवासीयांना मिळत आहे. याचे कारण म्हणजे सध्या जी पाणीपुरवठ्याची योजना कार्यरत आहे ती अपुरी पडत आहे. परंतु सध्याच्या परिस्थितीनुसार पुरेशी असणारी अमृत अटल योजना काम पूर्ण होऊन उपलब्ध देखील आहे. परंतु बीड नगरपालिकेकडे ३६ कोटी रूपयांचे वीजबिल थकलेले असल्याने महावितरण विभाग या नवीन पाणीपुरवठा योजनेला वीज कनेक्शन देत नाही. परिणामी पाणी आणि योजना हे दोन्ही उपलब्ध असताना बीडकरांना पाण्यासाठी पंधरा-पंधरा दिवस वाट पहावी लागते. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने पाठपुरावा केलेला आहे आणि तो आताही सुरूच आहे. आ.क्षीरसागर यांनी अनेक वेळा अधिवेशनात हा प्रश्न मांडला आहे. अनेकवेळा सरकारदरबारी मंत्री महोदयांकडे बैठका घेऊन हा प्रश्न लावण्यासाठी विनंती केली आहे. यासोबतच प्रशासकीय अधिकाऱ्यांकडेही याबाबतच्या बैठका घेऊन यात मार्ग काढण्यासाठी प्रयत्न केले आहेत. शेवटी या विषयात आ.संदीप क्षीरसागर यांनी माजी आ.सय्यद सलीम यांच्या माध्यमातून उच्च न्यायालयात जनहित याचिका देखील दाखल केली होती.

आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न विधिमंडळ, मंत्रालय, प्रशासन आणि न्यायालय अशा सर्वच स्तरावर मांडला आहे. याबाबत सातत्याने पाठपुरावा केला आहे. आताही याच प्रश्नावर आ.संदीप क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची भेट घेतली आहे. त्यावर ना.अजिदादांनीही लगेचच, बीड शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्यासाठी कार्यवाही करा, असे निर्देश नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम कुमार गुप्ता यांना दिले आहेत. आता ना.अजित दादा पवार यांच्या माध्यमातून बीड शहराचा गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागेलच अशी अपेक्षा आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे. दरम्यान याप्रसंगी ना.हसन मुश्रीफ साहेब तसेच वरिष्ठ स्तरावरील प्रशासकीय अधिकारी देखील उपस्थित होते.

## बीडच्या महिलेचा

उघड केले.

वेरूळ घाटातील वळणाजवळ दरीत १० नोव्हेंबर २०२४ रोजी एका स्त्रीचा कुजलेला मृतदेह सापडला होता. मृतदेह पूर्णतः कुजल्यामुळे ओळख पटवणे कठीण झाले होते. घटनास्थळी सापडलेल्या पांढऱ्या मण्यांच्या माळेसह हातात असलेल्या तीन धातूच्या अंगठ्या यावरून तपासाला सुरुवात करण्यात आली. शवविच्छेदनादरम्यान मृतदेहाच्या हाडाचा नमुना डीएनए तपासणीसाठी राखून ठेवण्यात आला होता.

दरम्यान, जवळपास एक महिन्याने ४ डिसेंबर २०२४ रोजी बीड शहरातील शांताबाई भारत धामुने (वय ६५ वर्षे) या ३ ऑक्टोबरपासून बेपत्ता असल्याची नोंद पोलीस ठाणे पेठ, बीड येथे असल्याची माहिती मिळाली. खुलताबाद पोलिसांनी मृतदेहाजवळ सापडलेल्या अंगठ्या आणि माळ तिच्या कुटुंबीयांना दाखवल्या. तिची मुलगी रत्नमाला शशिकांत सुते हिने अंगठ्या आणि माळ तिच्या आईची असल्याचा संशय व्यक्त केला. डीएनए नमुन्याद्वारे मृतदेह हा शांताबाई धामुने यांचा असल्याचे २३ जानेवारी २०२५ रोजी प्राप्त झालेल्या अहवालातून निष्पन्न झाले.

जुन्या ओळखीने घात केला

शांताबाई धामुने यांच्या फोन कॉलची तपासणी केली असता ३ ऑक्टोबर २०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील पडेगाव परिसरातील जावेद खान नुर खान याच्याशी वारंवार संपर्क झाल्याचे निष्पन्न झाले. त्या रात्री ९:३० वाजता पडेगाव येथे पोहोचल्या होत्या आणि त्यानंतर त्या बेपत्ता झाल्या. संशयावरून पोलिसांनी जावेद खानला ताब्यात घेतले. पोलिसांच्या चौकशीदरम्यान, जावेद खानने सांगितले की, तो पडेगाव येथे प्लॉट खरेदी-विक्री एजंट म्हणून काम करतो. शांताबाई धामुने यांची त्याच्याशी ओळख होती. त्या प्लॉट खरेदीसाठी ३ ऑक्टोबर २०२४ रोजी त्याच्याकडे रोख रक्कम घेऊन आल्या होत्या. पैशाच्या लालसेने त्याने त्याच्या सावत्र भावासह त्यांना गुंगीचे औषध दिले. दुसऱ्या दिवशी सकाळी ४ ऑक्टोबर रोजी वेरूळ घाटात नेऊन धारदार शस्त्राने गळा कापून त्यांचा खून केला आणि मृतदेह दरीत फेकून दिला.

पोलिसांच्या सातत्यपूर्ण तपासाला यश

या प्रकरणी जावेद खान नुर खान आणि नदीम खान नुर खान या दोघांना २७ जानेवारी २०२५ रोजी रात्री अटक करण्यात आली. त्यांना न्यायालयात हजर केले असता १ फेब्रुवारीपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. सुमारे तीन महिन्यांपूर्वी घडलेल्या घटनेत सुरुवातीला एक महिना तर ओळख उघडकीस होण्यासच लागले. त्यानंतरही पोलिसांनी तपासात सातत्य ठेवत आरोपींना अटक केली. पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार, उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धनंजय फराटे, सपोनि दिनकर गोरे, नवनाथ कोल्हे, योगेश्वर ताठे,